श्री. दत्ताजी सायगांवकर एक कुटुंबवत्सल आणि सामाजिक जाणीव असलेले कृतिशील व्यक्तिमत्त्व. त्यांच्या चरित्राचे विविध पैलू 'झेप क्षितिजापलीकडे'मध्ये उलगडत जातात. कॅनेडिअन सरकारने आपल्याच नियमांना अपवाद करून त्यांच्यासाठी विशेष पद तयार करावे, अशी त्यांची गुणवत्ता. सरकारी धोरणे व कायद्यांमध्ये सुधारणा सुचवण्याइतका त्यांचा अनुभव. कॅनडातले मूळ निवासी असोत की युगांडातले टोळीवाले असोत, त्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी माहिती गोळा करण्याकरता त्यांनी केलेली भ्रमंती. कॅनडात राहूनही भारतातल्या मोठ्या कुटुंबाला जोडून ठेवणारा त्यांच्यामधला जिव्हाळा, कॅनडात येणाऱ्या नात्याच्या, ओळखीच्या आणि अनोळखी लोकांची त्यांनी केलेली पाठराखण, स्वदेशाचे ऋण फेडण्यासाठी त्यांनी केलेली हिंदू सोसायटीची उभारणी आणि भारतातील अनेक सेवाभावी संस्थांना त्यांनी दिलेली आर्थिक संजीवनी हे सर्वच या चरित्रातून डोळ्यांसमोर उभे राहते. मला हे चरित्र वाचण्याआधी माहीत असलेले दत्ताजी हिमनगाचे समुद्राच्या पृष्ठभागावरचे छोटेसे टोकच होते, असे वाटले.

**डॉ. गिरीश बापट**
संचालक, ज्ञान प्रबोधिनी



मी आभारी आहे की, माझी जीवनकथा
लिहिण्यासाठी डॉ. चित्रलेखा पुरंदरे
यांच्यासारख्या सिद्धहस्त लेखिका लाभल्या.
समाधानी आयुष्य जगण्यासाठी आपली काही
तत्त्वं, ध्येयं निश्चित असावीत, असा विचार
करून मी त्यासाठी शक्य तेवढे परिश्रमही केले.
माझ्या जीवनात शिक्षणाचा भक्कम पाया निर्माण
करण्यासाठी, समाजातील गरजूंना साहाय्य
करण्यासाठी आणि त्याचबरोबर कौटुंबिक,
सांस्कृतिक नाती मजबूत करण्यासाठी वेळोवेळी
धोका पत्करला खरा; परंतु त्यातूनही जे
काही थोडेफार करू शकलो, त्यामुळे आनंद
मिळाला. या सगळ्यांचे 'रसभरित' वर्णन
या पुस्तकात अगदी सोप्या भाषेत, ओघवत्या
शैलीत केले गेले आहे. हे पुस्तक वाचून
एखाद्याच्या आयुष्याला प्रेरणा मिळून तो
यशस्वी झाला, तर माझ्या जीवनाचे सार्थक
झाले असे वाटेल. तेव्हा जरूर वाचावे आणि
अशीच 'झेप' घ्यावी...

सदैव तुमचा



" Shri Dattaji's contribution to the upliftment of tribal hamlets in India through our solar projects has been invaluable. He not only arranged for funding but took a personal interest in the programs. The book lays the context for a life 'fully lived" and is a playbook for how to give back to society starting from humble beginnings. "


- **Rotary Club**

" Late Dattaji was inspired by our founder, Goa Freedom Fighter, Late Mohan Ranade. Their beliefs of simplicity, modesty, honesty and vision for the socially downtrodden in their motherland, India, were fully aligned. We are thrilled to see this book come to fruition. "

- **Swami Vivekanand Jeevan Jyot Sanstha**

" Dattaji and I spent more than 20 years in community service together. With his unwavering support in Nysasdri (Orissa), we built agricultural water harvesting, shelter homes and improved education for distressed women in the tribal communities across the region. This book tells the story of a legendary human that impacted our community very deeply. "

- **Dr. Sarangadhar Samal, Director, Nysasdri, Orissa**



VISHWAKARMA PUBLICATIONS VP
www.vishwakarmapublications.com

चरित्र | ₹ ३५०/-

ISBN-978-93-93757-89-0
9 789393 757890

# झेप क्षितिजापलीकडे

**धाडस, ज्ञान, दान आणि विसावा यांची स्मृतिकथा!**

(कै. दत्तात्रय सायगांवकर यांची जीवनकहाणी )

## डॉ. चित्रलेखा पुरंदरे

VISHWAKARMA PUBLICATIONS
VP™

# झेप क्षितिजापलीकडे

## Zep Kshitijapalikade

First Edition published by Vishwakarma Publications in India in January 2023

ISBN **- 978-93-93757-89-0**

© **चित्रलेखा पुरंदरे**

भ्रमणध्वनी : ९९६०६०५०४३

'प्रथम आवृत्ती **- जानेवारी २०२३**

प्रकाशक
**विश्वकर्मा पब्लिकेशन्स**
३४ अ/१, सुयोग सेंटर, ७वा मजला,
गुलटेकडी-मार्केटयार्ड रस्ता, गिरीधर भवन चौक, पुणे **- ४११०३७**
दूरध्वनी : +९१-२०-२४५२५५३८ /+९१ ९१६८ ६८२२ ००
ई मेल : info@vpindia.co.in
वेबसाईट : www.vishwakarmapublications.com

मुखपृष्ठ : **श्रीश सायगांवकर**

अक्षरजुळणी/ मुद्रितशोधन : **टीम विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे**

छपाई : **दीपक मल्टी ऑफसेट, पुणे**

**₹ ३५०/-**

सर्व हक्क राखीव. प्रकाशकाच्या पूर्व परवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग, कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही प्रकारे पुनर्मुद्रित, अनुवादित अथवा रूपांतरित करता येणार नाही.

या पुस्तकात प्रकाशित झालेली मते लेखिकेची आहेत. यामध्ये कोणाचाही अवमान करण्याचा लेखिका अथवा प्रकाशक यांचा हेतू नाही. पुस्तकात प्रकाशित झालेल्या मतांशी विश्वकर्मा पब्लिकेशन्स सहमत असेलच, असे नाही.

देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी।
मना सज्ज्ना हेचि क्रिया धरावी॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावे।
परी अंतरी सज्ज्ना नीववावे॥

**समर्थ रामदासस्वामी कृत**
मनाचे श्लोक क्र. ८

**स्व. दत्ताकाका...**

आपल्या दोघा चिरंजीवांना,

माधुरीकाकूंना आणि आपल्या सगेसोयऱ्यांना

आपल्या **'क्षितिजापलीकडे झेप'** घेण्याच्या

जिद्दीबद्दल भरभरून सांगावंसं वाटलं,

ते अक्षरबद्ध करण्याचा माझा हा प्रयत्न...

आपल्याच स्मृतीला समर्पित...

**चित्रलेखा**

# अनुक्रम


शांत, संयत, सहयोगी, संपन्न व्यक्तिमत्त्व ९
मैत्र ज्ञान प्रबोधिनीशी ११
मनोगत १७
उपोद्घात २१
ऋणनिर्देश २२


विभाग पहिला

## चरित्र


१ बालपण आणि शिक्षण २५
२ सायगांवकर्स ३२
३ (भाऊ) भाव‘बंध’ ३९
४ प्रवास नोकरीचा ४३
५ गाठी ऋणानुबंधाच्या ४८
६ स्वप्नातल्या गावाकडे प्रयाण ५३
७ कॅनडातील सांस्कृतिक बहर ५८
८ पायाभरणी कर्तृत्वाची ६४

| | | |
|---|---|---|
| ९ | भेटी लागी जिवा... | ७७ |
| १० | एडमाँटन ते ओटावा | ८२ |
| ११ | कर्तव्यपरायण | ८८ |
| १२ | आफ्रिकेतील दोन वर्षे | ९९ |
| १३ | हिंदू सोसायटीची स्थापना व कार्य | १०४ |
| १४ | सोन्याची खाण | ११० |
| | उपसंहार | १२२ |

विभाग २

| | |
|---|---|
| स्मरणसुगंध | १२८ |

विभाग ३

| | |
|---|---|
| श्रद्धांजली | १६४ |

विभाग ४

**सायगांवकरांचे लेख व भाषणे**

| | | |
|---|---|---|
| १. | आजच्या पिढीची वाटचाल | २०८ |
| २. | TODAY'S YOUTH | २११ |
| ३. | विश्वग्राम संकल्पना | २१५ |
| ४. | ADDRESS OF THE CHIEF GUEST | २१८ |

| | |
|---|---|
| लेखिका परिचय | २२१ |

# शांत, संयत, सहयोगी, संपन्न व्यक्तिमत्त्व

श्री. दत्ता सायगांवकर यांना आपल्यातून जाऊन वर्ष झाले. माझा त्यांचा परिचय टोरांटोमधील माझे बंधू श्री. अजित कुकडे यांच्यामार्फत झाला. श्री. अजित १९६८मध्ये तिकडे गेला. श्री. दत्ताजी त्यांच्यानंतर सुमारे दोन वर्षांनी कॅनडामध्ये गेले. १९८३मध्ये आम्ही उभयता पती-पत्नी कॅनडामध्ये श्री. अजितकडे गेलो होतो. त्याच्यासोबत ओटावा येथे श्री. दत्ताजींकडे जाऊन पाहुणचार घेतल्याचे स्मरणात आहे. त्यानंतर तेथे झालेल्या आमच्या अनेक प्रवासात त्यांची भेट होत राहिली; पण अधिक वेळा भेट व त्यातून वाढती जवळीक त्यांच्या भारतातील प्रवासात, मुख्यतः पुणे व लातूर येथे होत राहिली.

त्यांच्या स्मृतीनिमित्त सर्व आप्तांनी मिळून एक छान ग्रंथ तयार केला आहे. तो मुख्यतः स्मरणरंजन (Nostalgic Memories) या स्वरूपाचा आहे. ते स्वाभाविक आहे. आपल्या चिरवियोग झालेल्या आप्ताविषयीच्या भावना त्यातून व्यक्त होतात. मन मोकळे होते. एका कर्तव्यपूर्तीचे, ऋणमुक्तीचे समाधान मिळते. व्यक्तीचे विविध गुणदर्शन होते. या पुस्तिकेच्या माध्यमातून मी ते अनुभवले.

माझा त्यांच्याशी जवळचा संबंध आला तो, लातूर-किल्लारी भूकंपानंतर जो सेवाकार्य-प्रकल्प आम्ही उभारले, त्या निमित्ताने. त्या काळात दत्ताजींकडे कॅनडातील महाराष्ट्र मित्रमंडळाचे नेतृत्त्व होते. आमच्या या प्रकल्पांना त्यांनी घसघशीत अर्थसाहाय्य केले. चालू प्रकल्पांना भेट देऊन त्यांनी समाधानही व्यक्त केले. त्यानिमित्ताने उभय पती-पत्नीचा आमच्याकडे मुक्काम झाला, सुखसंवाद झाला, जवळीक वाढली. त्यांच्या काही कौटुंबिक कार्यक्रमांतही सहभाग घेता आला. एका धार्मिक संस्कार कार्यक्रमात, त्यांच्यामुळे स्वातंत्र्यसैनिक मोहन रानडे यांची भेट झाली. फार काळापूर्वी त्याची पुण्यात भेट झाली होती, तिला उजाळा मिळाला.

१९६० व ७० या दोन दशकांत भारतातून - महाराष्ट्रातून कॅनडात जाऊन, पुढे स्थायिक झालेली ही पहिली पिढी म्हणता येईल. या पिढीचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी आपले भारतीयत्व व मराठीपण जिवापाड जपले. आपली मुळे (roots) कोठे आहेत, याचे सदैव भान ठेवले. केवळ भावनात्मक न राहता, भारतात विविध कामांसाठी भरपूर योगदान केले. त्यासाठी चांगले संघटन उभारले. स्थायी संस्थेची निर्मिती केली व समाधानाची गोष्ट म्हणजे, आपल्या पुढील पिढीकडेही हा वारसा त्यांनी संक्रमित करण्याचे प्रयास जारी ठेवले. श्री. दत्ताजी सायगांवकर हे या पिढीचे सुयोग्य प्रतिनिधी आहेत.

या निमित्ताने त्यांच्या स्मृतीला अभिवादन करतो.

**पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे**
संस्थापक विश्वस्त, विवेकानंद हॉस्पिटल, लातूर
भूतपूर्व क्षेत्रसंघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
लातूर (महा.)